ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, १ एप्रिल, १९६४ | अंक ७

## विविध माहिती

**१९६३ सालांत निर्यातींत वाढ**— १९६३–६४ ह्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या १० महिन्यांत भारताच्या निर्यातीनें उच्चांक गांठला आहे. ह्या अवधींत एकूण निर्यात ६६५·३ कोटी रुपये किमतीच्या मालाची झाली. त्यामागील आर्थिक वर्षाच्या ह्याच कालांत एकूण निर्यात ५८३·४ कोटी रुपये किंमतीची झाली होती. ही निर्यात ८२ कोटींनीं अधिक आहे. १९६३ च्या जानेवारींत ६२ कोटींची निर्यात करण्यांत आली होती. १९६४ च्या जानेवारींतील निर्यात ३ कोटींनीं वाढली आहे.

**सरकार हॉटेल चालविणार**—भारत सरकारच्या गृह-निर्माण आणि पुनर्वसन खात्यानें एक लि. कंपनी काढून नवी दिल्ली येथील जनपथ हें हॉटेल चालविण्याचें ठरविलें आहे. नव्या कंपनीचें नांव 'जनपथ हॉटेल्स लि.' असें असून तीं सर्वस्वीं सरकारच्या मालकीची राहील. कंपनीचें भांडवल १ कोटी रुपये आहे. एका सेवानिवृत्त आय. सी. एस. अधिकाऱ्याची कंपनीच्या अध्यक्षपदीं नियुक्ति करण्यांत आली आहे. चालू आर्थिक वर्षासाठी म्हणून ९·२५ लाख रुपये गुंतविण्यांत येणार आहेत.

**स्वनातीत विमानांची खरेदी**— ध्वनीपेक्षाहि अधिक वेगानें प्रवास करणारीं प्रचंड प्रवासी विमानें बांधण्याची तयारी अमेरिकेंत व युरोपमध्यें चालू आहे. ह्या विमानांच्या गुणांचा तौलनिक अभ्यास एअर इंडिआच्या तज्ज्ञांकडून करण्यांत येत आहे. अमेरिकेंत तयार होणाऱ्या अशा विमानासाठी १५ लाख रुपयांची अनामत रक्कमहि देण्यांत येणार आहे. परंतु रक्कम दिल्यानें विमान घेण्याचें बंधन एअर इंडियावर पडणार नाहीं.

**रेल्वेसाठी लागणारे स्लीपर्स**—रेल्वेच्या रुळाखालीं घालण्यासाठीं लागणाऱ्या लाकडी स्लीपर्सचा पुरवठा म्हैसूर सरकारचें जंगलखातें ह्या वर्षीं अधिक प्रमाणांत करूं शकेल. गेल्या वर्षी खात्यानें रेल्वेला २२ लाख घनफूट स्लीपर्स पुरविले होते. ह्या वर्षीं २५ लाख घनफुटांचा पुरवठा करण्यांत येणार आहे. हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट आणि संरक्षणखातें ह्यानाहि खात्यानें ३७,५०० टन लाकूड पुरविलें आहे. रेल्वेला लागणाऱ्या स्लीपर्सचा पुरवठा मुख्यत: म्हैसूरच्या जंगलखात्याकडूनच होतो.

**विदर्भामधील कागदाची गिरणी**—विदर्भांत काढण्यांत आलेल्या विदर्भ पेपर मिल्स ह्या कारखान्यानें उत्पादनास प्रारंभ केला आहे. कारखाना नागपूरपासून १३ मैलांवर स्थापन करण्यांत आला असून तो रोज ५ टन कागदाची निर्मिति करूं शकेल. विदर्भ भागांतील औद्योगिक विकास घडवून आणण्याच्या कामांतील हें एक महत्त्वाचें पाऊल मानण्यांत येत आहे.

**म्हैसूर राज्यासाठी राजभवन**—म्हैसूर राज्याच्या राज्यपालांना राहण्यासाठी राज्याच्या मुख्य मंत्र्यांच्या सध्यांच्या निवासस्थानाचा उपयोग करण्यांत येण्याचा संभव आहे. मात्र ह्या इमारतींत कांहीं फरक करावे लागतील. म्हैसूरचे हल्लींचे राज्यपाल जय चामराज वडिआर शहरांतील आपल्या राजवाड्यांतच राहात असल्यामुळें आतांपर्यंत राज्याला स्वतंत्र राजभवनाची गरज भासली नव्हती. आतां त्यांच्या जागीं जनरल श्री. नागेश राज्यपाल म्हणून येत असल्यानें त्यांच्यासाठी राजभवनाची सोय करावी लागणें अपरिहार्यच आहे.

**जळणाचा प्रश्न सुटण्यास मदत**—मद्रास राज्यांत काढण्यांत आलेल्या नेवेली येथील विद्युत्पादन केंद्रानें अप्रत्यक्षतः राज्यांतील जळणाचा प्रश्न सोडविण्यास मदत केली आहे. विद्युत्केंद्रासाठी वापरण्यांत येणारा कमी प्रतीचा कोळसा योग्य संस्करण केल्यास साध्या कोळशासारखा वापरतां येतो असें आढळून आलें आहे. मद्रास राज्यांत जंगली लाकडापासून बनविलेला कोळसा हळुहळू दुर्मीळ होऊं लागला आहे. कारण जंगलें तुटत चाललीं आहेत. शिवाय संस्कार केलेला दगडी कोळसा किंमतीच्या दृष्टीनेंहि साध्या कोळशापेक्षा परवडणारा आहे.

**तीन हजार डॉलर्स किंमतीचें पत्र**—अमेरिकेचे दिवंगत अध्यक्ष प्रे. केनेडी ह्यांच्या पत्नीला बर्मिंगहॅम येथील एका गृहस्थानें १९५५ मध्यें एक पत्र लिहिलें होतें. पत्रांत सदर गृहस्थानें श्रीमती केनेडी ह्यांच्याकडून मदत म्हणून २० हजार डॉलर्स मागितले होते. श्रीमती केनेडी ह्यांनीं पैसे आपल्या पक्षास न देतां आपल्याला द्यावेत असें सुचविण्यांत आलें होतें. श्रीमती केनेडींनीं उत्तर पाठविलें, त्यांत मदत का करता येत नाहीं, हें लिहिलें होतें. हे पत्र सदर गृहस्थाकडून ८० डॉलर्सला विकत घेण्यांत आलें आणि त्याचा लिलांव करण्यांत आला. बोस्टनमधील एका वकिलानें ते ३ हजार डॉलर्सना घेतलें.

**आणखी वैद्यकीय कॉलेजें नकोत**—मद्रास सरकार चिंगलपट आणि कोइमतूर येथें खाजगी संस्थांमार्फत दोन वैद्यकीय कॉलेजें काढण्याचा विचार करीत होतें. हीं कॉलेजें येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरूहि होणार होतीं; परंतु मध्यवर्ती सरकारच्या आरोग्य मंत्र्यांनीं राज्यसरकारला असा सल्ला दिला आहे कीं सध्यां नवीन कॉलेजें काढण्यांत येऊं नयेत. त्यापूर्वी चालू कॉलेजें अधिक भक्कम पायावर उभीं करण्यांत यावींत. शिवाय नवीन वैद्यकीय कॉलेजांना शिक्षक मिळणेंहि अवघड जात आहे.

## धंद्यांतील नुकसान कोणतें ?

### ( प्राप्तिकर कायद्याच्या क. १० ( १ ) चा अर्थ )

माधुरी राजेश्वर या इसमाकडे टाटा मर्सिडीज बेंझची एजन्सी होती. एके दिवशीं दुकानाच्या कामाच्या तासांत एक तिऱ्हाईत इसम दुकानांत आला आणि दुकानदाराशीं बोलूं लागला. जवळच दुकानांतील पैशाची पेटी होती. बोलणें चालू असतां दुकानदार टेलिफोनवर बोलणें करण्याकरितां दुसऱ्या खोलींत गेला. या संधीचा फायदा घेऊन त्या तिऱ्हाईत इसमानें ती पैशाची पेटी चोरली आणि तो पसार झाला.

१९५७-५८ या वर्षाच्या इन्कम-टॅक्सचा जेव्हां हिशोब करण्यांत आला तेव्हां चोरी गेलेले ४,००४ रु. दुकानदारानें धंद्यांतील नुकसान म्हणून दाखविलें आणि प्राप्तीकर कायद्याच्या क. १० ( १ ) खालीं हें नुकसान उत्पन्नांतून वजा करण्यांत यावें अशी मागणी केली.

इन्कम्-टॅक्स अधिकाऱ्यानें ही मागणी मान्य केली नाहीं; त्यावर दुकानदारानें अपेलेट असिस्टंट कमिशनरकडे अपील केलें. तें अपील नामंजूर झाल्यामुळें दुकानदारानें ट्रायब्यूनलकडे अपील केलें. परंतु तें अपीलहि फेटाळण्यांत आलें. दुकानदाराच्या म्हणण्यावरून इन्कम्-टॅक्स अपेलेट ट्रायब्यूनलनें पुढील प्रश्न हायकोर्टाच्या निकालाकरितां पाठविला:—

" प्रस्तुत मामल्याच्या हकिकतीवरून आणि परिस्थितींत चोरीमुळें झालेलें ४,००४ रुपयांचें नुकसान इन्कम्-टॅक्स कायद्याच्या क. १० ( १ ) खालीं उत्पन्नांतून वजा करतां येईल काय ? "

" तिऱ्हाईत इसमानें दुकानाच्या कामाच्या तासांत केलेल्या चोरीमुळें झालेलें नुकसान धंद्यांतील नुकसान म्हणतां येईल काय?"

हा हायकोर्टापुढील मुख्य प्रश्न होता. या प्रश्नाचें उत्तर दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरावर अवलंबून आहे. चोरीमुळें झालेल्या नुकसानीचा दुकानदाराच्या धंद्याशीं निकटचा अथवा प्रत्यक्ष संबंध होता काय ?

या प्रश्नाचें उत्तर हायकोर्टानें नकारार्थी दिलें. बद्रीदास डागा वि. कमिश्नर ऑफ इन्कम्-टॅक्स; ( ऑ. इं. रि. १९५८ सुप्रीम कोर्ट ७८३ ) या सुप्रीम कोर्टाच्या निवाड्यांत असें म्हटलें आहे कीं, प्राप्तीकराच्या कायद्याच्या क. १० ( १ ) खालीं धंद्यांतील नुकसान उत्पन्नांतून वजा करतां येतें. परंतु तें नुकसान धंद्यांतून प्रत्यक्षपणें उद्भवलेलें असलें पाहिजे. धंदा चालविण्याशीं त्या नुकसानीचा निकटचा संबंध असला पाहिजे. धंद्याशीं तें नुकसान निगडित असलें पाहिजे. धंद्याशीं थोडा फार संबंध असलेल्या कोणत्याहि नुकसानीला धंद्यांतील नुकसान म्हणतां येणार नाहीं.

प्रस्तुत मामल्यांत दुकानाच्या कामाच्या तासांत तिऱ्हाईत इसमानें दुकानदाराची पैशाची पेटी चोरली. हें नुकसान दुकानदाराच्या धंद्यांतून प्रत्यक्षपणें उद्भवलें किंवा त्याचा धंद्याशीं निकटचा संबंध होता असें म्हणतां येणार नाहीं. तें नुकसान धंद्याशीं निगडित नव्हतें. प्रस्तुत मामल्यांत चोरीमुळें झालेल्या नुकसानीचा धंद्याशीं इतकाच संबंध होता कीं चोरी दुकानदाराच्या धंद्याच्या जागेंत आणि कामाच्या तासांत झाली. यापलीकडे त्या चोरीमुळें झालेल्या नुकसानीचा दुकानदाराच्या धंद्याशीं कांहींच संबंध नव्हता.

दुकानांत झालेल्या चोरीमुळें झालेलें नुकसान दुकानदाराच्या धंद्यांतून उद्भवलें नसल्यामुळें त्या नुकसानीला धंद्यांतील नुकसान म्हणतां येणार नाहीं आणि प्राप्तिकर कायद्याच्या क. १० ( १ ) खालीं तें नुकसान उत्पन्नांतून वजा करतां येणार नाहीं असा निकाल देऊन हायकोर्टानें विचारलेल्या प्रश्नाला नकारार्थी उत्तर दिलें.

—न्यायबोध


दि सरदार
कारबोनिक गॅस कंपनी लि.
उत्पादक
कारबोनिक ॲसिड गॅस
सुका बर्फ, सोडा वॉटर मशिनरी
आणि
खनिज पाण्याच्या आवश्यकतेसंबंधीं विक्रेते
रजिस्टर्ड हेड ऑफिस आणि एजन्टस्चें ऑफिस
सर विठ्ठलदास चेंबर्स, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
फॅक्टरी ऑफिस : कॅनॉट रोड, माझगांव, मुंबई. टे. नं. ४०८१२
शाखा आणि फॅक्टरी
१ केडल रोड, दादर, फ्रिझाइट फॅक्टरी टे. ६२११९
२ काम्पटी फॅक्टरी एरिया, रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस, काम्पटी ( कँट ) टे. २०८
३ दिल्ली-रामबाग रोड, बंगेश पूल टे. २२४७०१
४ कलकत्ता-१०२ ए फोरशोर रोड, शिवपूर, हावरा. टे. ६७-२२४७
५ विजयवाडा-गुणदला, कृष्णाजी स्ट्रीट, आंध्र प्रदेश टे. १०४१
६ रावळपिंडी-डलहौसी रोड.
सर्व शाखांसाठी आणि फॅक्टऱ्यांसाठी टेलिग्राफिक पत्ता : ' कारबोनिक '

# अर्थ

बुधवार, १ एप्रिल, १९६४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## उद्योगधंद्यांच्या केंद्रीकरणाचे धोके

कोणत्याहि देशाचें औद्योगिकरण सुरू झालें कीं उद्योगधंद्यांना लागणाऱ्या सोयी उपलब्ध असणाऱ्या शहरांतून उद्योगधंद्यांचें केंद्रीकरण होऊं लागतें. म्हणूनच भारतांत कृषि-औद्योगिक समाज निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहेत. मुंबईसारख्या शहरांतून नव्या उद्योगधंद्यांना परवानगी न देण्याचें धोरणहि उद्योगधंद्यांच्या केंद्रीकरणाला पायबंद घालण्याच्या हेतूचेंच द्योतक आहे. उद्योगधंद्यांच्या वाढीमुळें रोजगारी उपलब्ध होत असली आणि धनोत्पादन वाढत असलें तरी इतर अनेक गुंतागुतीचे प्रश्न प्रामुख्यानें निर्माण होत असतात. शहरांतील उद्योगधंद्यांच्या वाढीबरोबर येथील लोकसंख्याहि वाढत जाते आणि आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण होतात. उद्योगधंद्यांच्या वाढीबरोबर राहण्याच्या जागांची निर्मिति पाहिजे त्या प्रमाणांत होत नाहीं, हा अनुभव सर्वत्र येत आहे. त्यामुळें सर्वच मोठ्या शहरांतून गलिच्छ वस्त्या अस्तित्वांत येतात. ह्या व इतर अनेक धोक्यांबरोबरच आणखी एक आपत्ति कोसळू पाहात आहे. पण तिचें स्वरूप अद्याप नीट लक्षांत आलेलें दिसत नाहीं. कारखाने म्हटले कीं त्यांना पाण्याचा पुरवठा हा लागतोच. कारखान्यांतील उत्पादनांत वापरलें गेलेलें पाणी बहुधा जवळपासच्या नदीनाल्यांस सोडण्यांत येतें. शहरांतील गटाराचें घाणेरडे पाणीहि असेच सोडण्यांत येतें. परिणामी संबंधित नदीच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या गांवांचें आरोग्य बिघडतें. नवीन उद्योगधंदे उभारतांना त्यांच्या सांडपाण्याची कांहींतरी बिन-धोक्याची व्यवस्था करणें अगत्याचें झालें आहे.

---

## नॅशनल बुक ट्रस्टचीं प्रकाशनें खपण्यास अडचण

भारत सरकारच्या सिव्हिल डिपार्टमेंटसुवरील ऑडिटचा अहवाल लोकसभेपुढें ठेवण्यांत आला आहे. नॅशनल बुक ट्रस्टसंबंधीं ह्या अहवालांत दिलेली माहिती उद्‌बोधक आहे. जानेवारी १९५७ ते डिसेंबर १९६२ ह्या कालावधींत ट्रस्टमार्फत एकूण ६५ प्रकाशनें प्रसिद्ध करण्यांत आलीं. परंतु प्रकाशित करण्यांत आलेल्या पुस्तकांचा खप फक्त ५ ते ४२ टक्क्यांपर्यंत झालेला आहे. कांहीं प्रकाशनें तर अजिबात विकलींच गेलीं नाहींत. कांहीं प्रकाशनांच्या बाबतींत १९६२ अखेर ५४ ते ८९ टक्के प्रती शिल्लक राहिलेल्या आढळून आल्या. १९६० पूर्वी १९ प्रकाशनांच्या मिळून ४६ हजार प्रती काढण्यांत आल्या होत्या. १९६३ च्या जून अखेरीपर्यंत त्यांपैकी अवघ्या १३,३४६ प्रती विकल्या गेल्या. २,७१८ प्रती फुकट वाटण्यांत आल्या; २८,९३६ प्रती विकल्या न गेल्यानें पडून राहिल्या. १९६१ पासून जूनच्या १९६३ पर्यंत ४९ प्रकाशनांच्या मिळून १ लाख, २६ हजार, ५१८ प्रती छापण्यांत आल्या त्यांपैकी फक्त ४३,२४५ प्रती विकल्या गेल्या. ५,३०३ प्रती मोफत वाटण्यांत आल्या आणि ७७ हजार ९७० प्रती न विकल्या गेल्यामुळें पडून राहिल्या. प्रकाशनांच्या प्रसिद्धीसाठी जो प्रत्यक्ष खर्च आला त्याच्या ३४० टक्के खर्च इतर बाबींवर झालेला आढळून आला. ह्या बाबी म्हणजे ट्रस्टच्या नोकरांचे पगार, प्रवास भत्ते, भाडें, वीज बिल, इत्यादी होत. पण ह्या बाबींवरील खर्च हिशेबांत दाखवितांना मात्र त्याचें प्रमाण प्रत्यक्ष खर्चाच्या १०० टक्के धरण्यांत आलेलें आहे. अशा तऱ्हेनें ठरविण्यांत आलेल्या किंमतींतहि ५० टक्के विक्रीचें कमिशन दिलेलें होतें.

---

## स्टेट बँकेच्या अधिक कचेऱ्या

गेल्या कांहीं वर्षांत बँकिंगच्या धंद्याची बरीच वाढ झालेली असली तरी ती मुख्यत: शहरापुरतीच मर्यादित राहिलेली आहे. ग्रामीण भागांत बँकिंगच्या सवलती उपलब्ध करून देणें खर्चाचें असल्यानें आणि बँकेमार्फत व्यवहार करण्याची संवय ग्रामीण भागांत नसल्यानें स्टेट बँकेच्या शाखांना सुद्धां तेथें नेहमींच फायदा होत नाहीं. पहिलीं कांहीं वर्षें ह्या शाखा तोट्यांतच चालवाव्या लागणें अपरिहार्य झालेलें आहे. तरी सुद्धां स्टेट बँकेचे अध्यक्ष श्री. वेंकटप्पय्या ह्यांनीं ग्रामीण भागांत शाखा काढण्याचा विचार सोडून दिलेला नाहीं. येत्या पांच वर्षांच्या कालांत नागरी विभागांत व ग्रामीण विभागांत मिळून ३१९ नव्या शाखा काढण्याचा कार्यक्रम स्टेट बँकेनें आखलेला आहे. ह्यापूर्वी बँकेनें शाखा वाढविण्याचा एक कार्यक्रम आंखून त्याची अंशत: अंमलबजावणीहि केलेली आहे. ह्या कार्यक्रमांत ठरविण्यांत आल्याप्रमाणें बँकेच्या ७० कचेऱ्या आतांपर्यंत उघडण्यांत आल्या आहेत; आणि पुढील वर्षाच्या अखेरपर्यंत आणखी ७५ कचेऱ्या स्थापन करण्यांत यावयाच्या आहेत. बँकेनें विकासाच्या कामासाठी जो निधि राखून ठेवलेला आहे. त्यांतून आतांपर्यंत ११ लाख रुपये खर्च केलेले आहेत. १९६२ सालीं बँकेनें शाखा वाढविण्याचा उपक्रम हातीं घेतलेला होता. पण त्या कामीं बँकेला तोटा सहन करावा लागला होता. तो भरून काढण्यासाठी प्रयत्न करण्यांत येत आहेत. ग्रामीण भागांत बँकिंगच्या धंद्याचा प्रसार होण्यास फक्त पैशाचीच जरूर असते असें नाहीं; पैशाबरोबरच ग्रामीण भागांत काम करण्यास लायक अशा प्रशिक्षित नोकरांचीहि तितकीच जरूरी असते.

---

## दक्षिण भारतामधील अणुवीज केंद्र

अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करणारें एक केंद्र दक्षिण भारतांत काढण्याचें ठरवून केंद्रासाठी जागा निवडण्याचें कामहि एका कमिटीकडे सोंपविण्यांत आलें होतें. कमिटीनें आंध्र, मद्रास आणि म्हैसूर ह्या राज्यांतून प्रत्येकी एका जागेची निवड केलेली आहे. मद्रासमधील महाबलीपुरम् येथील जागा कमिटीच्या मतानें सर्वांत सोयीस्कर आहे. तथापि, अद्याप जागेबद्दल निश्चित निर्णय घेण्यांत आलेला नाहीं.

---

### क्रिकेटच्या मैदानाचें रक्षण करण्यासाठी बक्षीस

क्रिकेटच्या मैदानाचें पावसापाण्यापासून रक्षण करण्यासाठी ५०० पौंडांचें बक्षीस इंग्लंडमध्यें जाहीर करण्यांत आलें आहे. पावसामुळें क्रिकेटचे अनेक सामने बंद पडतात आणि त्यामुळें प्रेक्षकांच्या व खेळाडूंच्या उत्साहावर पाणी पडतें. पण, म्हणूनच केवळ बक्षीस जाहीर करण्यांत आलें आहे असें नाहीं. अनेक कौंटी क्लबांचे सामने रद्द झाल्यामुळें त्यांचें आर्थिक नुकसानहि होतें. सध्या पावसापासून रक्षण करण्यासाठी फलदाजांच्या दोन जागांतील १०–१२ फुटांचा रुंद पट्टाच काय तो आच्छादित करण्यांत येतो. पण त्यामुळें खेळाच्या उरलेल्या मैदानाची दलदल होण्याचें टळत नाहीं. परिणामीं खेळ बंदच ठेवावा लागतो. म्हणून सर्वच मैदान खेळण्याइतपत त्वरित कोरडें होण्यासाठी त्यांतील पाणी वाहून जाण्याची एखादी युक्ति शोधण्यांत येत आहे.

---

### 'बँक', 'बँकिंग' आणि 'बँकिंग कंपनी' शब्दांच्या वापरावर निर्बंध

१ फेब्रुवारी, १९६४ पासून बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या ७ व्या कलमांतील दुरुस्ती अमलांत आली. ( मूळ कलमाचे जागीं नवीनच कलम घालण्यांत आलें. ) आतां कोणत्याहि फर्मला, व्यक्तीला किंवा व्यक्तिसमूहाला आपल्या व्यवसायाच्या नांवांत 'बँक', 'बँकिंग' किंवा 'बँकिंग कंपनी' ह्यांपैकी कोणत्याहि शब्दाचा वापर करता येणार नाहीं; तसा वापर करणें बेकायदा ठरून ६४ ( ४ ) कलमाप्रमाणें २,००० रु. पर्यंत दंडास पात्र होईल. ह्या शब्दाचा वापर चालू ठेवलेला आढळला, तर हा दंड होऊन पुनः शिवाय प्रत्येक दिवसाला १०० रु. दंड होईल. ह्यासाठी संबंधितांनीं आक्षेपार्ह ठरवलेल्या शब्दांचा असा वापर बंद करावा.

---

### स्वीडनच्या मदतीनें अणुशक्ति केंद्र

भारतांत आणखी एक अणुशक्ति केंद्र उभारण्यासंबंधीं स्वीडनमधील अणुविज्ञान शास्त्रज्ञ आणि हिंदी शास्त्रज्ञ ह्यांच्यांत विचार-विनिमय चालू आहे. अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करण्यासाठी नेहमींप्रमाणें जड पाण्याचा उपयोग करण्यांत येईल. आरंभीं ह्या केंद्राची वीज निर्माण करण्याची क्षमता १७० मेगॅवॅट ते २०० मेगॅवॅट असेल. परंतु नंतर ती ३५० मेगॅवॅटपर्यंत वाढवितां येईल. इंधन म्हणून नैसर्गिक युरेनिअम आणि थोरिअम ह्यांचा उपयोग करण्यांत येईल. संकल्पित केंद्राच्या उभारणीचा तपशीलवार अभ्यास करण्यासाठी स्वीडन आणि भारत ह्यांचे अणुविज्ञानज्ञ एकमेकांच्या देशांत जाऊन केंद्राची रूपरेखा ठरविण्याच्या प्रयत्नांत आहेत.

---

### युरेनिअमच्या खाणीवरून वितुष्ट

सिकिअँगमधील युरेनिअमच्या खाणींचा उपयोग करण्याच्या प्रश्नावरून रशिआ आणि चीन ह्यांच्यामधील सरहद्दीचा तंटा बराच चिघळला आहे. खाणींच्या मालकीचा वाद उपस्थित होण्यापूर्वी सिकिअँगमध्यें युरेनिअमचें संस्करण करणारे दोन कारखाने रशिअन देखरेखीखाली चालू होते. परंतु आतां त्यांचें काम थांबविण्यांत आलें आहे. युरेनिअमच्या खनिजाचा रशिआला होणारा पुरवठा चीननें बंद केला आहे. १९५९ सालीं चीननें भारतावर प्रथम आक्रमण केलें. त्या वेळीं, आक्रमण थांबविल्यास अणुशस्त्रें निर्माण करण्याबाबत देऊं केलेल्या सहकार्याचा फेर-विचार करावा लागेल, असा इशारा रशिआनें चीनला दिला होता.

### खताच्या कॉर्पोरेशनला कर्ज

आंतरराष्ट्रीय विकास संघटना ह्या अमेरिकेमधील संस्थेकडून भारताच्या फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिआ लि. ह्या कंपनीला ७८ लाख डॉलर्सचें कर्ज मंजूर करण्यांत आलें आहे. कर्जाचा उपयोग करून मुंबईजवळ 'प्रेथानॉल' तयार करण्याचा कारखाना उभारण्यांत येणार आहे. कारखान्यांत तयार होणाऱ्या रासायनिक पदार्थांमुळें प्लॅस्टिक, औषधें, रंग आणि कृत्रिम धागे तयार करणाऱ्या उद्योगधंद्यांना फ़ायदा होईल.

---

### जपानच्या शेतीतज्ज्ञांची मदत

जपानच्या सरकारच्या शेती व जंगलखात्यांतील तज्ज्ञांचें एक मंडळ भारताच्या दौऱ्यावर येणार आहे. मंडळांत सहा सभासद असून ते ७ आठवड्यांचा दौरा करणार आहेत. जपानमधील शेतीच्या पद्धतीचें प्रात्यक्षिक देण्यासाठी भारतांत नमुनेदार शेतें स्थापन करण्याबाबत त्यांचा सल्ला घेण्यांत येणार आहे. गेल्या वर्षींहि अशीच एक तज्ज्ञांची तुकडी भारतांत आली होती. तिनें केलेल्या पहाणीस अनुसरून आंध्र, केरळ, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश ह्या राज्यांत जपानी पद्धतीचीं शेतें उभारण्याचें ठरविलें आहे.

---

### पूर्व पाकिस्तानांतून आलेले आश्रयार्थी

पूर्व पाकिस्तानांतून भारतांत आलेल्या १०,००० निर्वासित कुटुंबांची सोय चांदा जिल्ह्यांत करण्यांत येणार आहे. येत्या कांहीं आठवड्यांतच १०,०० निर्वासित कुटुंबें त्यांच्यासाठी उभारण्यांत आलेल्या तात्पुरत्या छावण्यांत येतील. निर्वासित कुटुंबांची कायमची सोय लावण्यासाठी ६ नवीन नगरें स्थापन करण्यांत येत आहेत. ह्या नवीन नगरांत पाणी, वीज, आरोग्य इत्यादि सोयी करण्यांत येतील.


प्रगतिपर सेवेचें ३४ वें वर्ष !

दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना : १९३० ] [ शेड्यूल्ड बँक

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव.

फोन : ११८ —::— तार : SERVICE

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ८ लक्ष |
| रिझर्व्हज् | रु. ६·५१ लक्ष |
| ठेवी | रु. २·३० कोटींचे वर |
| खेळतें भांडवल | रु. २·६३ कोटींचे वर |

स्थानिक शाखा

शहापूर ( फोन : ७१८ ) आणि टिळकवाडी

मुख्य कचेरी, रविवार पेठ, बेळगांव, येथें आणि गोकाक व निपाणी शाखांत सेफ डिपॉझिट लॉकर्स उपलब्ध आहेत.

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

म्हैसूर आणि कर्नाटकांतील महत्त्वाच्या केंद्रांत ३१ शाखा

ए. आर. नाईक,
बी. ए., बी. एससी., एलएल. बी.,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## सहकारी साखरकारखान्यांमुळे परिसराचा कायापालट

लेखक :—श्री. वसंतराव पाटील,
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य स. सा. का. संघ.

महाराष्ट्र राज्यांत १९५० सालीं सहकारी साखर व्यवसायाचा श्रीगणेशा केला. सहकार–चळवळ–महर्षि मा. डॉ. ध. रा. गाडगीळ व पद्मश्री मा. श्री. विखेपाटील यांनीं प्रवरानगर येथील पहिला सहकारी कारखाना स्थापन केला. ४००–५०० रुपयांची लहानशी प्राथमिक सोसायटी चालविणाऱ्या सहकारी चळवळीनें हें एक धाडस केलें. हा प्रयोग यशस्वी होतो कीं नाहीं याबाबत अनेकांनीं शंका व्यक्त केली होती. परंतु डॉ. गाडगीळ व पद्मश्री विखेपाटील यांच्या कुशल मार्गदर्शनानें १–१।२ कोटीचा साखर-कारखाना यशस्वी झाला; इतकेंच नव्हे तर या प्रयोगाच्या यशस्वितेनें सहकारी साखर व्यवसायाला नवीन चालना मिळाली. शेतकरी स्वतःचें भांडवल तर उभारूं शकतोच परंतु तांत्रिक ज्ञान देखील संपादन करूं शकतो हें या प्रयोगानें सिद्ध केलें व जे या प्रयोगाकडे नाक मुरडून पाहात होते त्यांना आश्चर्याचा धक्का बसला.

आज महाराष्ट्रांत १९ सहकारी साखर कारखाने साखर निर्मिति करीत असून २० वा कारखाना लौकरच कार्यान्वित होईल, असा माझा विश्वास आहे. या २० कारखान्यांत अंदाजें ४९ कोटी रुपये भांडवल गुंतलें आहे. ५० हजारांच्यावर ऊंस उत्पादक शेतकरी सभासदांनीं ७ कोटी रुपये भाग भांडवल जमा केलें आहे; ३ कोटी, १२ लाख रुपये सभासदांची ठेव जमा झाली आहे. २ कोटी, ६० लाख रुपये सरकारी भाग भांडवल आहे, व बाकीचें भांडवल आय्. एफ्. सी. व सहकारी बँकेकडून कर्जें घेऊन उभे करण्यांत आलें आहे. तसेच १९६२–६३ च्या हंगामांत आपल्या कारखान्यांनीं ७ कोटी, ८० लाख रुपये एक्साईज ड्यूटी भरली आहे, १ कोटी, ११ लाख रुपये केन–सेस दिला, १३ कोटी २६ लाख रुपये शेतकऱ्यांना उसाची किंमत दिली व ३० कोटी २२ लाख रुपयांची साखर निर्माण केली.

एक साखर कारखाना स्थापन झाल्यानें आसपासच्या १५ ते २० मैलांच्या परिसरांत कसा कायापालट होऊं शकतो हें मी आपल्याला सांगणार आहें. हा कायापालट खाजगी कारखानदार करूं शकत नाहीं हें मला आपल्याला आग्रहानें सांगावयाचें आहे. खाजगी साखर कारखाने उत्तम चालले आहेत याबाबत माझें दुमत नाहीं. परंतु कारखाना उत्तम चालल्याचा परिणाम आर्थिक केंद्रीकरण करण्याकडे होत असेल तर त्याचा आपण जरूर विचार करायला पाहिजे.

### जीवनाचा कायापालट

सहकारी साखर कारखाने ग्रामीण भागांत निर्माण व्हायला लागल्यापासून तो भाग उजळून निघाला आहे, हें आपणांस दिसूं शकेल. साखर उत्पादन करणें एवढाच मर्यादित दृष्टिकोण आमच्या कारखान्यांसमोर नाहीं. साखर उत्पादन तर आम्ही करतोंच आहोंत. परंतु त्याचबरोबर सभोंवतालचा कायापालट कसा करतां येईल याचाहि आम्ही विचार करतों. शेती मालाच्या मार्गांतील एक महत्त्वाची अडचण म्हणजे निश्चित बाजारपेठ. ही अडचण साखर कारखाने निघाल्यानें दूर झाली. कच्च्या मालाला निश्चित भाव मिळूं लागला. शेतकऱ्यांची उत्पादनक्षमता वाढली. त्याला सोसायटीकडून भरपूर कर्ज मिळूं लागलें. सोसायटीचें कर्ज परस्पर कारखान्याकडून वसूल होऊं लागलें. सोसायट्यांची थकबाकी कमी झाली. त्यांचें भाग भांडवल वाढलें. ठेवींत वाढ झाली. खेळतें भांडवल वाढूं लागलें. सोसायट्यांमार्फत होणारा खतांचा व तेलांचा व्यवहार वाढला. शेतकऱ्यांच्यामध्यें उत्पादन वाढविण्याची स्पर्धा चालूं झाली. उसाला चांगला व निश्चित भाव मिळूं लागल्यानें त्यांच्या खिशांत चार पैसे जाऊं लागले. बैल-गाड्यांबरोबर ट्रॅक्टर्स व मालमोटारी आल्या. शेतींत तो यंत्राचा उपयोग करूं लागला. शेतीला बारमाही पाणीपुरवठा करण्यासाठी पंप बसविले. जिरायत शेतीचें बागायत शेतींत रूपांतर व्हायला लागलें. ऊंसउत्पादनाबरोबर फळफळावळांचें उत्पादन वाढीस लागलें. त्यांच्या राहणींत सुधारणा व्हायला लागली. घरांत सायकली, रेडिओ व फर्निचर आले गुळाच्या ढेपी मोजणारा टनांत गूळ मोजूं लागला. त्याला आपल्या मुलांना शिक्षण देण्याची गरज भासूं लागली. शेतकऱ्यांचीं मुलें ज्ञानाच्या विविध क्षेत्रांत प्रवेश करूं लागली. शहरांत जाऊन महाराष्ट्रांत विद्यालयीन शिक्षण घेणें शक्य होऊं लागलें. हा सर्व फरक स्वतःच्या मालकीचा कारखाना निघाल्यानें झाला, हें मी अभिमानानें सांगूं इच्छितों.

### आत्मविश्वास निर्माण झाला

शेतीवरील भार दिवसेंदिवस वाढत होता. शेती–धंदा हा कांहीं वर्षभर पुरणारा धंदा नाहीं. ५ ते ६ महिने शेतीवर काम चालतें; बाकीचे दिवस शेतकऱ्याला रोजगार राहात नाहीं. म्हणजे ५ ते ६ महिन्यांच्या श्रमावर त्याला १२ महिन्यांची पोटगी मिळवावी लागते. शिवाय वाढत्या लोकसंख्येला ग्रामीण भागांत दुसरा उद्योग नसल्यानें शेतीवरच अवलंबून राहावें लागतें, किंवा खेड्यांतील तरुण वर्ग शहराकडे धाव घेतो. उद्योगधंदा नसल्यानें खेडीं ओस पडतात व शहरांची भरमसाट वाढ व्हायला लागते. त्यामुळें शहरांत बकाल वस्त्याहि वाढतात. परंतु ग्रामीण भागांत कारखाना निघाल्यानें कामधंदा वाढला. हंगामाच्या काळांत शेतीचीं कामें करून बाकीच्या वेळांत शेतकरी कारखान्यांत कामाला जाऊं लागला. मजुरीच्या दरांत वाढ झाली व प्रत्येक वर्षी कामाची निश्चिती झाली. साखर हंगाम चालू झाल्यावर कारखाना जवळ जवळ ३,५०० लोकांना रोजगार देतो. १,००० बैलगाड्या व कांहीं मोटारी उसाची वाहतूक करण्यांत गुंतलेल्या असतात. याशिवाय शेतकरी मालक स्वतःबरोबरच इतर ५,००० माणसांना शेतीवर मशागतीचें काम देऊं शकतो. खेड्यांत खितपत पडलेला शेतकरी आतां खडबडून जागा झाला आहे. सहकारी कारखानदारीमुळें स्वतःचें भवितव्य स्वतः घडविण्याचा आत्मविश्वास त्याच्यांत निर्माण व्हायला लागला आहे.

शेतकरी शेतीउत्पादनांत वाढ करण्याचें नवीन नवीन प्रयोग व योजना राबवीत आहे. उसाचें बीं निर्माण करून सभासदांना देण्यासाठी कारखान्यांनीं स्वतःचीं फार्म्स चालविलीं आहेत. उसाच्या रोगांवर निरनिराळ्या औषधांचा वापर कसा करावा हें शेतकऱ्यांना शिकविलें जातें. कारखान्यांच्या फार्म्समध्यें शास्त्रीय-दृष्ट्या तयार केलेलें बीं शेतकऱ्यांना दिलें जातें. भरपूर पाणी-पुरवठा होण्यासाठीं कारखान्यामार्फत लिफ्ट इरिगेशन सोसायट्या काढल्या जात आहेत. खतांचा वापर कसा करावा हें सांगितलें जातें. उसाची लागवड कधीं करावी हा कार्यक्रम शेतकऱ्यांना आंखून दिला जातो.

### इतर जोडधंद्यांना चालना

हें झालें शेतीउत्पादनाविषयीं. शेती उत्पादनाबरोबरच ग्रामीण उत्पादनांत भर घालण्यासाठी जिराईत व बागाईत शेतकऱ्यांसाठी कोणकोणते उद्योगधंदे काढतां येतील याचाहि विचार कारखाना सातत्यानें करतो. शेतीवरील भार हलका करण्यासाठी लोकसंख्येचा

काहीं भाग जोडधंद्यांत गुंतवतां येईल. त्या दृष्टीनें कारखान्यांनीं डेअरी व पोल्ट्री हे धंदे वाढविण्याची योजना राबवावयाला सुरुवात केली आहे. याखेरीज शेतकऱ्यांना बैलगाड्या व ट्रक देण्यासाठी कारखान्याकडून लोकांना भांडवल-पुरवठा केला जातो, व ऊसवाहतुकीच्या कामांतून त्यांना दिलेलें भांडवल परत वसूल करून घेतलें जातें.

आर्थिक विकासाबरोबरच शैक्षणिक विकासांत कारखान्यांनीं लक्ष घालायला सुरुवात केली आहे. शेती मालाला निश्चित मार्केट, उत्पादनांत झालेली वाढ, शेतीवरील भार कमी होऊन इतर जोड धंद्यांना मिळालेली चालना या सर्वांचा परिणाम म्हणजे शिक्षणाबाबत शेतकऱ्यांच्या मनांत निर्माण झालेली आवड. कारखान्यांच्या परिसरांत हायस्कूल्स, कॉलेजिस निघूं लागलीं आहेत व त्यासाठी कारखान्यांनीं कारखान्यांनी सढळ हातांनीं आर्थिक व इतर साहाय्य केलें आहे. प्रवरा सहकारी साखर कारखान्यानें पब्लिक स्कूलच्या धर्तीवर एक स्कूल स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळें इंग्रजी शिक्षणाचा फायदा शेतकऱ्यांच्या मुलांना होईल. तसेच वारणा सहकारी साखर कारखान्यानें १९६४-६५ पासून महाविद्यालय काढण्याचा निर्णय घेतला आहे. मी अशी आशा व्यक्त करतों कीं, वरील दोन्हीहि संस्था पुढील शैक्षणिक वर्षापासून सुरू होतील. केवळ उदाहरण म्हणून वरील दोन कारखान्यांचा नामनिर्देश केला आहे. संघाच्या प्रत्येक सभासद कारखान्यांनीं अशाच प्रकारचीं कामें अंगावर घेतलीं असून त्यांचा फायदा ग्रामीण भागांत करून दिला जातो.

—नवसंदेश

## ब्रिटनमध्यें घोड्यांच्या शर्यतींचा षोक

ब्रिटिश राजवट भारतांत स्थिरावल्यावर जे अनेक परदेशी खेळ आले त्यांत घोड्यांच्या शर्यतीच्या खेळाला अग्रपूजेचा मान मिळाला. ह्या खेळाला 'खेळांचा राजा' असें नामाभिधानच प्राप्त झालेलें आहे. राज्यकर्ते आणि समाजांतील वरिष्ठ आणि श्रीमंत ह्यांच्या तर घोड्यांच्या शर्यती हा महत्त्वाचा षोक होऊन बसला. खुद्द ब्रिटनमध्यें घोड्यांच्या शर्यतींना अजूनहि महत्त्वाचें स्थान आहे. घोड्यांच्या शर्यतीसाठी येणाऱ्या ब्रिटनमधील धनिक स्त्रिया अद्यावत पोशाख घालून येतात. अर्थात फॅशन सुचविणाऱ्यांना व शिंप्यांना त्यामुळें चांगली प्राप्ति होते. ब्रिटनमधील रेसेसचा हंगाम नुकताच सुरू झाला आहे. ह्या हंगामांत रेसेसमध्यें पळणाऱ्या घोड्यांवर ४०कोटी पौंड लावले जातील असा अंदाज आहे. त्यावरून ब्रिटिश लोकांत ह्या खेळाचीं मुळें किती खोल गेलेलीं आहेत हें स्पष्ट होते. हंगामांत २,५००रेसेस खेळल्या जातील ह्याणि त्यांत ६,००० घोडे भाग घेतील. ह्या खर्चिक खेळांत घोड्यांच्या सर्वच मालकांना नफा होतो असें नाहीं. त्याचें कारण रेसच्या घोड्यांची निगा राखणें हें काम फार खर्चाचें असतें. एक घोडा बाळगण्यासाठीं किमान १,२०० पौंड खर्च दरसाल करावा लागतो. ब्रिटनमध्यें रेसेस खेळण्याचीं ७० मैदानें आहेत. रेसच्या मैदानांवर येण्यासाठी प्रवेश फी द्यावी लागते. हें उत्पन्न व शर्यतीवर लावण्यांत आलेले पैसे ह्यांमधून २५ लाख पौंड बक्षिसांसाठी ठेवण्यांत येतात. तरीपण शर्यतींत सहज पैसा मिळविण्याचें फारच थोड्यांचें स्वप्न कधींकाळीं खरें होतें. रेसच्या खेळांतील बुकीज मात्र चांगले गब्बर होतात. ३ हजार बुकीजपैकी २०० बुकीज तर सालीना ६ हजार पौंडांची कमाई करतात.

## बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रश्न

### सरकारची दुतोंडी भूमिका : पाश्चात्यांच्या मदतीची पार्श्वभूमि

नवीन बँकिंग कायद्यानें सरकारला दिलेले अधिकार बँकिंगच्या व्यवसायाचें नियंत्रण करायला पुरेसे आहेत, त्यामुळें प्रत्यक्ष राष्ट्रीयीकरणाची गरजच नाहीं, असें भारत सरकार स्वतःच्या 'डाव्या' अनुयायांना सांगतें. बँकांचें राष्ट्रीयीकरण केलें तर पाश्चात्य राष्ट्रांच्या मदतीवर त्याचा परिणाम होईल. स्टेट बँकेच्या आतां ९४० शाखा आहेत; म्हणजे सर्व बँकांच्या एकूण शाखांच्या एकचतुर्थांशाइतक्या आहेत. स्टेट बँकेकडेच ३०% ठेवी आहेत; हें प्रमाण वाढत जाऊन ५०% पर्यंतहि जाईल. भारत सरकार दुसऱ्या तोंडानें सांगतें, कीं कायद्यानें दिलेले अधिकार वापरण्याची सक्ति नाहीं; रिझर्व्ह बँक अगदीं जरूर तेव्हांच त्यांचा वापर करीत. योजनेच्या उद्दिष्टाला धरून जोंपर्यंत खासगी बँकांचा कारभार चालू आहे, तोंपर्यंत त्यांना भवितव्याबद्दल भीति वाटण्याचें कारण नाहीं. पार्लमेंटमधील ५६ काँग्रेस सभासदांनीं बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा आग्रह करणारें पत्र पं. नेहरूंना पाठविलें, तेव्हां त्याला असें उत्तर मंत्रिमंडळाच्या एका सभासदानें दिलें.

सर्वत्र तुटीची परिस्थिति असतांना बँकांच्या पैशाचा वापर भाववाढींतून नफा मिळविण्याकडे केला जात आहे, अशी बँकांविरुद्ध तक्रार आहे. त्याला बँकांचें उत्तर असे, कीं गेल्या दहा वर्षांत बँकांचीं उद्योगधंद्यांना दिलेलीं कर्जें एकूण कर्जाच्या ३०% चीं ५०% वर गेलीं आहेत. व्यापारी कर्जें फक्त ३०% आहेत; आयात-निर्यात व्यापाराचाहि त्यांतच समावेश आहे. मालाचे तारणावर दिलेल्या सर्व कर्जावर रिझर्व्ह बँकेचें नियंत्रण आहे.

अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी, हे बँकर्सशीं साधारणतः सहमत आहेत. काळ्या बाजारांतील पैशांच्या गैरवापराचा प्रश्न खरा महत्त्वाचा आहे, असें त्यांचें मत आहे. तथापि, बँकांत एकवटलेल्या आर्थिक सत्तेच्या विरोधकांच्या एका मुद्यांत तथ्य आहे. केवळ पांच बड्या बँकांकडे एकूण ठेवींच्या निम्म्या ठेवी आहेत. प्रमुख २० बँकांचे १८८ डायरेक्टर १,१०० कंपन्यांच्या बोर्डावर आहेत. सरकारी मालकीच्या बँकिंग क्षेत्राची वाढ आणि बँकिंगच्या व्यवहारावरील कायद्याचीं नियंत्रणें, हीं अशा आर्थिक केंद्रीकरणाला आळा घालूं शकतील, हें सरकारला दाखवून द्यावें लागेल. तोंवर, ज्या बँकांना ठेवीदारांच्या संरक्षणासाठी घातलेलीं कायद्याचीं तरतेपणाचीं व इतर बंधनें पाळतां येणार नाहींत, अशा बँका कमी होऊन कमी कमी बँकांतच आर्थिक अधिकारांचें केंद्रीकरण होण्याची शक्यता आहे.

## चीनला परदेशी बँकांची मदत

न्यूयॉर्क टाइम्समध्यें प्रसिद्ध करण्यांत आलेल्या वार्तेप्रमाणें चीननें परदेशांत केलेल्या गव्हाच्या खरेदीसाठी चीनला ब्रिटिश, फ्रेंच व स्विस् बँकांनीं मदत केली आहे. गव्हाची किंमत रोखीनें देण्याची चीनची कुवत नव्हती. अर्जेंटायनानें गहूं उधारीवर देण्यास नकार दिला होता. ह्या बँकांनीं चीनला परदेशीय चलनाचा केलेला पुरवठा आपआपल्या सरकारांना कळवूनच केला होता, इतकेंच काय, पण ब्रिटिश व फ्रेंच बँकांना सरकारची हमीहि मिळाली होती. शिवाय बँकांनीं दिलेल्या कर्जाचे व्याजाचे दरहि त्यांच्या नेहमींच्या दरापेक्षा कमी आहेत.

## कंपन्यांच्या नोकरांतील चोरीची भावना

दुकानांतून आणि कारखान्यांतून नोकरवर्गाच्या गैरविश्वासूपणाचें प्रमाण किती आहे, ह्याचा अंदाज करणें कठीण आहे. कांहीं कृत्याकडे मालक दुर्लक्ष करतात, तर चोरीसारख्या कृत्याला शासन केलें जातें. प्रत्येक धंद्यांतील पद्धत वेगवेगळी असते. घरें बांधणीच्या धंद्यांत वाया जाणारें लाकूड नोकरांनीं नेण्याची पद्धतच पडलेली आहे, तर बँकेंतून कुठलेंच नाणें घरीं नेतां येत नाहीं. थोडेसें तेल घरीं नेलें, तर तें लांबविण्याच्या सदरांत बसतें; विक्रीसाठी ५ हें. वेट तेल नेलें तर ती चोरी होईल. १ रुपयाची वस्तु नेली तर ती लांबविली म्हणायची; २५ रुपयांची नेली तर चोरी म्हणायची !

लांबविण्याचे प्रकार खूपच मोठ्या प्रमाणावर नेहेमींच चालत आलेले आहेत; ज्याला शक्य होईल तो लांबविल्याखेरीज राहात नाहीं. असा मनुष्य दुसऱ्या कुणाला आपली अडचण सांगूं शकत नाहीं; ती निवारण्याचा त्याला एवढा एकच उपाय दिसतो.

पैसे उचलणारा आपली समजूत करून घेतो, कीं आपण पैसे तात्पुरते घेत आहों; ते परत करावयाचे आहेत. "प्रत्येक जणच तसें करतो" अशीहि कल्पना तो कधींकधीं करून घेतो. मला मिळावयाची बढती फर्मनें दिली नाहीं, तेव्हां फर्म माझी देणेंच लागते; मग पैसे उचलायला काय हरकत आहे ? असेंहि तो मनांत ठरवतो. सबंद जगच माझ्याविरुद्ध आहे. तेव्हां मी आत्मसंरक्षणासाठी कांहींहि केलें तरी क्षम्य आहे, अशीहि विचारसरणी शक्य असते.

अशा परिस्थितींत, मालकानें उपाययोजना काय करावी ? मानवी गुणदोषांच्या दृष्टीनेंच ह्या प्रश्नाचा विचार केला पाहिजे; तिजोऱ्या आणि कुलुपें तो प्रश्न सोडवूं शकणार नाहींत. कार्यक्षमतेचा अभाव चोऱ्यांना पोषक होतो. गैरविश्वासूपणाच्या ९०% प्रकारांना रूढ अर्थाच्या गुन्हेगारांचा हात नसतो. माहितीच्या गुन्हेगारांवर लक्ष ठेवतां येतें; पहिलाच गुन्हा कुणीहि करूं शकतो.

नोकरांना उचलेपणा करायचा मोहच होऊं न देणें, हेंच सर्वांत महत्त्वाचें ठरतें. कुठलाहि गैरप्रकार वरचेवर झाला, तर तो इतर नोकरांच्या नजरेस आल्याविना राहात नाहीं. अशा गैरप्रकाराविरुद्ध वातावरण निर्माण करणें मालकाला साधलें पाहिजे म्हणजे गैरप्रकारांना आळा बसतो; त्यांची मालकाला खबर मिळूं शकते.

नोकराचा पगार आणि त्याची राहाणी ह्यांत फार तफावत दिसून आली, तर जास्त चौकशी करायला हवी. नोकराच्या पगाराच्या मानानें त्याच्यावर फार मोठी जबाबदारी फर्मनें टाकणें चुकीचें ठरतें. इंडेम्निटी पॉलिसीचें तत्त्वच मुळीं असें आहे, कीं विमेदारावर त्याच्या पगाराच्या मानानेंच जबाबदारी टाकलेली असली पाहिजे. जबाबदारीच्या मानानें आपल्याला कमी पगार मिळतो, अशी नोकराची भावना झाली, म्हणजे तो स्वतःच उचलेगिरी करून भरपाई करूं पाहातो.

उचलेगिरीचा मोह जसा मिळूं देतां कामा नये, त्याचप्रमाणें त्याला संधीहि लाभूं देतां कामा नये. एकाच्याच नियंत्रणाखालीं एखादी बाब पूर्णपणें न ठेवणें आर्थिक कारभाराचे नियम सर्वजण (त्यांचा दर्जा कितीहि मोठा असो) पाळतात ना ह्यावर लक्ष ठेवणें आणि सर्व काम अगदीं बिनबोभाट चालू न ठेवणें, हे संधि लाभूं न देण्याचे तीन मार्ग आहेत.

नियम हे सुस्पष्ट असायला हवेत. 'उसने घेणें' म्हणजेच 'चोरी' असं शेंकडा ७५ बाबतींत तरी घडतें, असें एका पहाणींत आढळून आलें आहे.

कामावर असलेल्या नोकरांचे संख्येवर बरेंच अवलंबून राहातें; कुणीहि संशयातींत असत नाहीं. नोकरांचा दर्जा जेवढा मोठा तितकी चोरीहि मोठी. आळंदी–पंढरपूरची यात्रा करणारा, सामाजिक पुढारी, जबाबदारीचे जागीं काम करणारा, फर्मचा जुना नोकर, कुणाहिबद्दल खात्री देतां येत नाहीं.

खासगी जीवनांत पापभिरू असणारे लोक नोकरीचे जागीं कसे धीट होतात ? (१) ज्याची आर्थिक परिस्थिति बिकट आहे, (२) ऐपतीपेक्षा ज्यास्त खर्च करून दिमाख दाखविणारा किंवा परस्त्रीलंपट असणारा आणि (३) जुगारांत पैसे गमावलेला, अशा तीन प्रकारच्या परिस्थितींत चोरी करण्याचें धारिष्ट्य प्राप्त होतें. चांगल्या कामाला पारितोषकहि यायला हवें. आपल्या कामाचें चीज होत नाहीं, ह्या जाणीवेनें नोकरांत कडवटपणा निर्माण झाला म्हणजे त्यामुळें फर्मचें जें नुकसान होतें, त्यापेक्षा त्याला ज्यास्त पगार किंवा बक्षीस देणें स्वस्त पडतें. वरिष्ठ अधिकाऱ्यांची राहाणी नोकरांच्या देखत फार छानछोकीची असतां कामा नये; "आम्ही कामें करून मरतो आणि हे आमच्या कष्टावर मजा मारतात" अशी नोकरांची भावना होता कामा नये—"कंपनीच्या ड्रायव्हरनें चालविलेल्या मोटारगाड्यांतून ते हिंडतात, तर मग आम्हीं तरी कां गप्प बसावे ?"

## गृहिणींची सोय करणारा नवा चमचा

आहार आणि आरोग्य ह्यांचा संबंध अगदीं निकटचा आहे. अन्न पदार्थांतील जीवनसत्वांचा शोध लागल्यापासून तर आरोग्यदायक अन्न शिजविण्याकडे अधिकाधिक लक्ष पुरविण्यांत येत आहे. शास्त्रशुद्ध पाकसिद्धीसाठी आणि गृहिणीचें स्वयंपाकघरांतील श्रम हलके करण्यासाठी पाश्चात्त्य देशांत अनेक प्रकारचीं उपकरणें वापरण्यांत येत असतात. आतां ह्या उपकरणांत एका नव्या चमच्याची भर पडली आहे. चमच्याच्या मुठींना उष्णतादर्शक घड्याळ बसवून अन्न ढवळतांनाच उष्णता मोजण्याची सोय करण्यांत आली आहे. हे चमचे अमेरिकेंत विक्रीलाहि आले आहेत. चमच्यांच्या वाटीसारख्या भागाजवळ पाऱ्याचा बल्ब असतो आणि उष्णतामापक घड्याळाची तबकडी मुठीच्या टोकाला असते. घड्याळांत ५० ते ४५० अंश उष्णता दाखविण्याची सोय आहे. चमच्यांत घेतलेल्या पदार्थांचें तात्काल वजन करणारे चमचेहि कांहीं वर्षांपूर्वी निघाल्याचें वृत्त होतें. असल्या अद्ययावत् शास्त्रीय उपकरणांच्या साह्यानें अमेरिकन महिला पाकसिद्धि बघतां बघतां करतात ह्यांत नवल नाहीं. भारतांत मात्र स्वयंपाकघरांत नवीनवीं उपकरणें वापण्याची पद्धत अद्याप विशेष प्रचलित नाहीं. मोठ्या शहरांतून गॅससारखें आधुनिक जळण वापरण्यांत येत असलें तरी मध्यम शहरांतून आणि खेड्यापाड्यांतून अजून जळाऊ लाकडांचा आणि शेणगोऱ्यांचाच जमाना आहे. मोठ्या शहरांतून मात्र अलीकडे आधुनिक स्वयंपाकघराचा प्रसार होऊं लागला आहे. तरीसुद्धां शहरांतील सुशिक्षित स्त्रियांना आधुनिक उपकरणांचा वापर करण्यास शिकावेंच लागतें. भारत कारखानदारीच्या तंत्रविद्येंत मागासलेला आहे तसाच तो स्वयंपाकांतहि आहे.

## २०० रुग्णांच्या इस्पितळाची देणगी

पश्चिम जर्मनीमधील प्रॉटेस्टंट पक्षाच्या संघटनेनें इंडोनेशिआला २०० रुग्णांची सोय असलेलें एक फिरतें इस्पितळ देणगी म्हणून दिलें आहे. तें प्रथम एका बेटांत उभारण्यांत येणार आहे. इस्पितळ उभारण्याची प्राथमिक तयारी करण्यासाठी १५ जर्मन तज्ज्ञ आधींच रवाना करण्यांत आले आहेत. हें सर्वच्या सर्व इस्पितळ एका जर्मन बोटीनें सुमात्राकडे रवाना करण्यांत आलें. इस्पितळांत सर्व प्रकारचीं आधुनिक वैद्यकीय उपकरणें आहेत.

## भारत मदत मंडळाकडून मिळणारी मदत

भारत मदत मंडळांतील देशांची बैठक पॅरिसमध्यें भरली होती. ह्या बैठकींत भारताला मदत देण्याची जरुरी पटवून देण्याचा प्रयत्न करण्यांत आला आणि तो बराच यशस्वी झाला अशी वार्ता आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या ४ थ्या वर्षासाठी भारताला मिळूं शकणारी मदत मागील वर्षांत मिळालेल्या मदतीपेक्षा अधिक असणार नाहीं. गेल्या ऑगस्टमध्यें भरलेल्या मंडळाच्या बैठकींतून भारताला १०५·२ कोटी डॉलर्स अथवा ५०० कोटी रुपये मदत उपलब्ध झाली होती. जवळपास तितकीच मदत ह्यावर्षी मिळेल असा रंग दिसत आहे. भारतातर्फे करण्यांत आलेली मागणी ५२५ ते ५४५ कोटी रुपयांची होती. मंडळाचे सभासद असलेले देश व्यक्तिशः गेल्या वर्षाइतकीच मदत देण्यास अनुकूल दिसून आले. कांहीं देश कदाचित् मदतींत थोडी वाढ करण्याचा संभव आहे. पण ही वाढ फारशी विचारांत घेण्यासारखी नाहीं. हॉलंडकडून होणाऱ्या मदतींत अल्पशी वाढ होण्याची शक्यता आहे. पण हॉलंडला भारताकडून मोठ्या प्रमाणावर निर्यात होण्याचा संभव नाहीं. अर्थातच मदतींत होणारी वाढ बेताबाताचीच असेल. पश्चिम जर्मनीकडून मिळणाऱ्या मदतीची पद्धत बदलण्यांत येण्याचा संभव आहे. ह्या बदलाचे स्वरूप अजून निश्चित करण्यांत आलेलें नाहीं. भारताला मिळणाऱ्या कर्जाच्या अटी अधिक सैल करण्यांत याव्या अशी मागणी करण्यांत आली असतां अमेरिकेच्या व ब्रिटनच्या प्रतिनिधींनीं तिला पाठिंबा व्यक्त केला. कर्जाच्या अटी कांहींशा सौम्य करण्यांत येतील अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

---

## भांडवल गुंतवणुकीपूर्वी आर्थिक पाहणी

इंडियन इन्व्हेस्टमेंट सेंटर ह्या संघटनेच्या आमंत्रणावरून सुमारें ३० प्रख्यात अमेरिकन कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी लवकरच भारतांत येणार आहेत. २२ कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनीं आमंत्रणाचा स्वीकार केला असून आणखी दहा कंपन्यांकडून त्याचा स्वीकार होईल, अशी अपेक्षा आहे. सेंटरचे अध्यक्ष श्री. जी. एल. मेहता ह्यासंबंधीं माहिती देतांना म्हणाले कीं, भारत सरकारच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ज्या मालाच्या उत्पादनाला अग्रहक्क देण्यांत आला आहे त्याच मालाचें उत्पादन करणाऱ्या ह्या कंपन्या बहुतांशीं आहेत. यांत्रिक हत्यारांना लागणारें पोलाद, मिश्र पोलाद, औद्योगिक यंत्रसामग्री, इत्यादि माल उत्पन्न करण्यांत ह्या कंपन्यांचा हातखंडा आहे. त्यांच्यापैकी कांहीं कंपन्यांनीं भारतांत भांडवल गुंतविण्याबाबत औत्सुक्य दाखविलेलें आहे आणि कांहीं तर आजच हिंदी भांडवलावरोबर सहकार्य करून उत्पादन करीत आहेत. भारतामधील आर्थिक परिस्थितीची आणि पैसे गुंतवण्याबाबतच्या शक्यतेची पाहणी करण्यासाठी ह्या कंपन्या आपले अधिकारी पाठवीत आहेत. भारताला भांडवलाची टंचाई भासत असल्यामुळे खाजगी मालकीच्या परदेशीय भांडवलाची मदत मिळविण्याचे प्रयत्न आवश्यक आहेत. भारताला लागणारें भांडवल आतां देशांतून खाजगी अगर सार्वजनिक विभागांतून जमा होणें अशक्य होत चाललें आहे. हें भांडवल परदेशांतील सार्वजनिक संघटनांच्या द्वाराहि मिळणें कठीण होत चाललें आहे. लोकांचें राहणीचें मान वाढविण्याचें ध्येय गांठावयाचें असेल तर देशांतर्गत आणि देशाबाहेरील जितकी साधनसंपत्ति उपयोगांत आणतां येईल, तितकी आणली पाहिजे.


दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ–पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर–**

| | | |
|---|---|---|
| चालू ठेव | ... ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... ... | ३ टक्के |
| **कायम ठेव–** | | |
| १ महिना | ... ... | २·३७ टक्के |
| ३ महिने | ... ... | ३·५० टक्के |
| ६ महिने | ... ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष | ... ... | ४ टक्के |
| २ वर्षे | ... ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... ... | ४·५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*
*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

: मुख्य कचेरी :
९, बेक हाउस लेन, फोर्ट मुंबई.
टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४

: विभागीय कचेरी :
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता : फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ४ कोटी ७५ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ४१ लाख |
| ठेवी | ... | २९ कोटी ६३ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ६७ कोटी ८७ लाख |

**महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

**संरक्षण निधीच्या रकमा या बँकेंत स्वीकारल्या जातात.**

## काळ्या बाजारांत कमावलेला पैसा
### कर चुकविण्याचा मार्ग

काळ्या बाजारांतील व्यवहार रोखीनेंच होतात. एखाद्यानें अशा व्यवहारांत २,००० पौंड मिळवले आणि त्यानें सरळ बँकेंत ठेवले तर त्याला १,६०० पौंड कर द्यावा लागेल. त्याला फक्त ४०० पौंडच उरतील. मग तो काय करतो ? हे २००० पौंड आणि स्वतःचे ४०० पौंड मिळून २,४०० पौंड शर्यतीच्या यशस्वी तिकिटांत गुंतवतो, १० पौंड बक्षीस जाहीर झालेल्या तिकिटाला १० पौंडापेक्षा थोडे जास्त पैसे देतो; शर्यत संपतांच, त्याचा दलाल टोटच्या खिडकीजवळ जाऊन हा व्यवहार करतो. म्हणजे २,४०० पौंडांना २,०००पौंड बक्षिसाचीं तिकिटें खरीदतो म्हणाना. नंतर हे २,००० पौंड तो रोख न घेतां, चेकनें घेतो आणि तो चेक बँकेंत भरतो. शर्यतींत मिळालेल्या पैशाला कर माफ असतो, त्यामुळें त्याचा कर वांचतो, म्हणजे ४०० पौंडांपेक्षा थोडें ज्यास्त नुकसान सोसून (दलालीचा खर्च पडतो तो लक्षांत घेतां) तो २,००० पौंड पचवतो. त्यानें मूळ २,००० पौंड जसेच्या तसे बँकेंत भरले असते, तर त्याचें १,६०० पौंड सरकारकडे गेले असते. म्हणजे त्याचा निवळ फायदा १,२०० पौंड झाला.

(हेन्री सेसिल : ॲलिबि फॉर ए जज्)

---

## आगबोट मालक संघटनेच्या अध्यक्ष
### श्रीमती सुमती मुरारजी

सिंधिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर, श्रीमती सुमती मुरारजी ह्यांची इंडियन नॅशनल स्टीमशिप ओनर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदीं निवड झाली आहे. ह्यापूर्वी एकदा त्या अध्यक्ष होत्या; १९६३–६४ सालीं उपाध्यक्ष होत्या.

---

## प्लॅस्टिकच्या दांतामुळें मृत्यु

प्लॅस्टिकचा कृत्रिम दात गिळल्यामुळें ढडले (इंग्लंड) येथील एक मनुष्य मृत्यु पावला; क्ष किरणांच्या फोटोंत तो दांत दिसूं शकला नाहीं. कृत्रिम दातांत आणि प्लेटमध्यें फोटोंत दिसेल असा पदार्थ वापरण्यांत आला नाहीं, तर असे आणखी मृत्यु संभवतील.

---

## दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि.

रविवार दिनांक २९-३-६४ रोजीं सकाळीं ९ वाजतां महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार वसंतराव नाईक ह्यांनीं कारखान्यास भेट दिली. या वेळीं कारखान्याचे कामगार व सेवकवर्ग यांचा सन १९६२–६३ सालचा 'बोनस वितरण समारंभ' त्यांचे हस्तें पार पडला.

---

## पदवीधरांतील बेकारीमध्यें वाढ

पदवीधरांतील बेकारी वाढत आहे. उद्योगविनिमय केंद्रांतील पदवीधरांच्या नोंदीचे आकडे असे आहेत:– १९६० मध्यें ४६,५८४, १९६१ मध्यें ५५,७८८, १९६२ मध्यें ६३,०८४ आणि १९६३ मध्यें ६७,३२०.

---

## भारतांत आलेले विदेशी प्रवासी

१९६३ मध्यें भारतांत एकूण १,४०,८२१ विदेशी प्रवासी आले होते. त्यांपैकी ४२,१२१ पश्चिम युरोपांतून आले होते. ३८,९६० अमेरिकन होते आणि १४,४४१ पूर्व युरोपांतील होते.

## बोनसच्या निवाड्याला स्टे ऑर्डर

इंडियन बँक लि. आणि तिचे नोकर ह्यांचेमधील १९५७ सालच्या बोनसाबाबत तंटा मद्रासच्या इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलकडे निवाड्यासाठी सोपविला होता. बँकेनें १०७ दिवसांच्या पगाराइतका (१०,२५,६६१ रु.) बोनस दिला होता; नोकरांची मागणी पांच महिन्यांच्या पगाराइतक्या बोनसची होती. १९५७ सालच्या नफ्याचा विचार करता, दिलेला बोनस भरपूर होता, असें बँकेचें म्हणणें होतें. २८ जानेवारी, १९६४ रोजीं ट्रायब्यूनलनें दिलेल्या निवाड्यानें नोकरांना आणखी ३३ दिवसांच्या पगाराइतका (३,१०,००० रु.) बोनस देवविला. ह्याविरुद्ध बँकेनें मद्रास हायकोर्टाकडे अर्ज केला, त्यानुसार हायकोर्टानें तात्पुरती स्टे ऑर्डर केली. अर्जाचें काम पुढें चालू होईल.

---

## खोटा चेक वटविण्याचा प्रयत्न फसला

खोटा चेक वटविण्याचा प्रयत्न करण्याबद्दल बचुभाई ईश्वरलाल भट्ट ह्या इसमास बृहन्मुंबईच्या ॲडिशनल सेशन्स जज्जांनीं ५ वर्षें सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. मुंबईचे बॅरोनेट सर चिनुभाई माधवलाल ह्यांच्या नांवाचे नोटपेपर त्यानें छापून घेतले होते. अशा नोटपेपरवर ईस्टर्न बँकेला पत्र टाइप करून एक सुटा कोरा चेक मागणी करण्यासाठी बँकेंत ढगे हें नांव धारण करणारा मनुष्य गेला. त्याला बँकेनें मागणीप्रमाणें एक सुटा कोरा चेक दिला आणि लागलीच सर चिनुभाईंना त्याची खबर दिली. असा चेक आपण मागविला नसल्याचें सर चिनुभाईंनीं सांगितलें. दुसऱ्या दिवशीं आरोपी बचुभाई ५,००० रुपयांचा बेअरर चेक वटविण्यासाठी आला. त्यावर सर चिनुभाईंची खोटी स्वाक्षरी होती; चेक शांतिलाल सी. मेहता ह्यांचे नांवें काढला होता. चेकचे पाठीवर आरोपीनें रतिलाल मगनलाल शहा अशी सही करून कॅशचें टोकन घेतलें. लागलीच बँकेच्या अधिकाऱ्यांनीं पोलिसांना बोलावलें आणि त्याला अटक करण्यांत आली. बचुभाई हा रस्त्यावरून हिंडून, चाकू-कात्र्या विकणारा फेरीवाला आहे.

---

## ठाण्याच्या खाडीवरील नवा पूल

ठाण्याच्या १०,००० फूट रुंदीच्या खाडीवरील २ कोटी, ३६ लक्ष रुपये खर्च येणाऱ्या पुलाचें भूमिपूजन संरक्षणमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण, ह्यांचे हस्तें ६ एप्रिल रोजीं होणार आहे. १९६७ अखेर पुलावरून वाहतूक सुरू होईल. पुलामुळें शीव तें पनवेल सरळ जातां येऊन पनवेल १३ मैल जवळ पडेल. समुद्राची भरती–ओहोटी, प्रचंड लाटा, खाडीच्या दोन्ही बाजूचा दोन मैल दलदलीचा प्रदेश, ह्या सर्वांवर विजय मिळवून बांधकाम पार पाडावें लागेल.

---

## वंशभेद नष्ट झाला नाहीं, तर ऑलिंपिकवर बहिष्कार

येत्या ऑक्टोबरपर्यंत श्वेतवर्णीयांशीं बरोबरीचा नागरी दर्जा प्राप्त झाला नाहीं, तर निग्रो स्पर्धकांनीं येत्या टोकियो ऑलिंपिक स्पर्धांत भाग घेऊं नये, असें त्यांना एम. व्हिटफिल्ड ह्या सुवर्णपदकधारी निग्रो क्रीडापटूनें आवाहन केलें आहे. १९४८ आणि १९५२ ह्या दोन्ही वर्षी व्हिटफिल्डला ८०० मीटर्स धावण्याचें सुवर्णपदक मिळालेलें आहे. ऑक्टोबरमधील टोकियो ऑलिंपिक्समधील शर्यतींत भाग घेणाऱ्या अमेरिकन स्पर्धकांपैकीं एक चतुर्थांश निग्रो असतील.

---

## ९४ हजारांचे ५० लाख झाले

बँक ऑफ इंडियानें कांहीं वर्षांपूर्वी ९४,००० रुपयांना खरीदलेली कांहीं मिळकत नुकतीच ५०,००,००० रुपयांना विकली.

**नगर येथील द्राक्षाचें प्रदर्शन**—महाराष्ट्र राज्याचें ४ थें द्राक्षाचें प्रदर्शन नगर येथें भरविण्यांत आलें होतें. ह्या प्रदर्शनांत ३४ बागायतदारांनीं भाग घेतला होता, व ४० निरनिराळ्या जातींच्या द्राक्षांचे नमुने मांडण्यांत आले होते. प्रदर्शनाचें उद्घाटन करतांना राज्यपाल श्रीमती विजयालक्ष्मी पंडित ह्यांनीं महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांनीं गेल्या १० वर्षांत द्राक्षाचें उत्पादन दुपटीनें वाढविल्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले. हें फळ पूर्वी श्रीमंतांच्याच आवाक्यांत होतें, पण आतां तें गरीबांपर्यंत पोंचलें आहे, असें त्या म्हणाल्या.

**वर्णभेदाविरुद्ध कायदा**—अमेरिकेंतील दक्षिणेकडील घटक राज्यांत निग्रोंविरुद्ध वर्णभेदाची भावना तीव्र आहे. परंतु दक्षिणेंतील मेरिलँड ह्या राज्यानें सार्वजनिक ठिकाणीं निग्रोंना वर्णभेदाची वागणूक देण्याविरुद्ध कायदा केला आहे. असा कायदा करणारें दक्षिणेंतील हें पहिलेंच राज्य आहे. दारू मिळण्याचीं ठिकाणें मात्र कायद्यांतून वगळण्यांत आलीं आहेत. मेरिलँड राज्याच्या ग्रामीण भागांत वर्णभेदाची भावना जोरकस आहे.

**रशिआकडून खताचा पुरवठा**—रशिआंतील शेतीला नत्रयुक्त खताचा पुरवठा अधिक प्रमाणांत करण्याचें ठरविण्यांत आल्यामुळें रशिआ भारताला नेहमींच्या प्रमाणांत खताचा पुरवठा करूं शकेल कीं नाहीं, ह्याविषयीं शंका वाटत होती. गेल्या वर्षीं रशिआनें भारताला १ लाख टन खत पुरविलें होतें. ह्याहि वर्षीं तितकें खत रशिआ पुरविणार आहे, असें स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. पटेल ह्यांनीं जाहीर केलें आहे. रशिअन खताच्या किंमतीहि आंतरराष्ट्रीय किंमतींपेक्षा कमी आहेत.

**नेपाळांत अन्नधान्याचा तुटवडा**—नेपाळच्या पूर्व व पश्चिम भागांतील डोंगराळ मुलुखांत अन्नधान्याची तीव्र टंचाई भासत आहे. सामान्यतः नेपाळमधून अन्नधान्याची निर्यात करण्यांत येत असते. परंतु सध्यांच्या टंचाईला तोंड देण्यासाठीं नेपाळला भारत आणि अमेरिका ह्यांच्याकडून अन्नधान्याची मदत घ्यावी लागणार आहे. नेपाळची राजधानी काटमांडू येथेंहि उकड्या तांदळाच्या किंमती भडकल्या आहेत. वास्तविक हा तांदूळ तेथें नेहमीं खाण्यांत नसतो.


दातांच्या स्वच्छतेसाठीं

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई–४. [ टेलिफोन ७२१००


बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | ,, ३। ,, |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | ,, ५ ,, |


*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

**सरदारगृह**

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्टें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.

* टिळक जन्म–शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :–३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.